कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/भ.का/२०२६–२०२७/४१२
दि.०५/०६/२०२६

**कृपया प्रसिध्दीसाठी**
**कला अकादमी आयोजित वास्को येथे भजन कार्यशाळा**

कला अकादमीतर्फे आयोजित करण्यात येणारी वास्को येथील भजन कार्यशाळा मिनी थिएटर, रविंद्र भवन, वास्को येथे ९ ते १३ जून २०२६ दरम्यान सकाळी १०.३० ते १.०० व सायं. २.०० ते ५.३० या कालावधीत जेष्ठ भजनी कलाकार श्री. दुर्गाकुमार नावती यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार आहे. युवा भजनी कलाकाराना भजन गायकीची शास्त्रशुध्द बैठक लाभावी आणि खासकरुन गोमंतकीय भजनी परंपरेचे संवर्धन व्हावे तसेच अकादमीच्या भजनस्पर्धेतील सादरीकरणात दर्जेदारपणा यावा या हेतूने कला अकादमीने सदर कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

सदर कार्यशाळेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या भजनी कलाकारांनी साध्या कागदावर पूर्ण तपशील नोंद करुन लिहिलेले आपले अर्ज घेऊन कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी सकाळी ९.३० पर्यंत प्रत्यक्ष उपस्थित राहावे. भजनासाठी आवश्यक असलेली टाळ जोडी प्रत्येक शिबिरार्थीने सोबत घेऊन यावी तसेच कार्यशाळेसाठी सलगपणे पाचही दिवस उपस्थित राहणे अनिवार्य आहे. वास्को व आजुबाजूच्या परिसरातील इच्छुक भजनी कलाकारांनी उपरोल्लेखित स्थळी उपस्थित राहावे, असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. संजीव ना. झर्मेकर)
कार्यक्रम अधिकारी

प्रति,
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)